# नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वाणिज्य शाखे
अंतर्गत पीएच.डी. (वाणिज्य) पदवीच्या पूर्तीसाठी
सादर केलेला संशोधन प्रबंधाचा सारांश


**संशोधक**

**वडजे सदानंद राजाराम**

एम.कॉम., एम.फिल.

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. एच. एस. पतंगे,**

M.Com., NET, SET (Com.)
MBA, SET (Mgt.) PH.D. (Com.)
यशवंत महाविद्यालय, नांदेड
(कला, वाणिज्य व विज्ञान)


**सादरस्थळ**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

# नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रस्तावना (Introduction) :-**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतातील एकूण लोकसंख्यापैकी ६५% लोक आजही ग्रामीण भागात राहतात व त्यांचा प्रमुख उत्पन्नाचे स्त्रोत व व्यवसाय शेती आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभूत गरजापैकी अन्नाची गरज शेती व्यवसायातून पूर्ण केली जाते व उदरनिर्वाहाचे साधन आज शेती आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास हा शेतीवर अवलंबून आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती व्यवसायाच वाटा ३०% ते ३५% इतका आहे. उद्योगाला लागणारा कच्चामाल पुरवठा शेती व्यवस्थातून केला जातो. उद्योगधंद्याच्या दृष्टीने शेती व्यवसाय महत्त्वाचा आहे.

कार्ल मार्क्स या विचारवंताने समतोल वाढीचे तत्त्व विशद करताना आर्थिक विकासात शेतीच्या प्रगतीला महत्त्व दिले.

महाराष्ट्र राज्य हे लोकसंख्याच्या प्रमाणात दुसरे स्थान आहे. ११.३० कोटी लोकसंख्या आहे, त्यापैकी ५४.७८% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. शेतीतील मुख्य पीके.

१. नगदी पीके कापुस, ऊस, तांदूळ, ज्वारी, गहू, हळद.

२. कडधान्य पीके हरभरा, तूर, मुग, उडीद

३. तेल पीके सुर्यफुल, भुरीमुग, तीळ, जवस, इत्यादी

आज बहुतांश शेतकऱ्यांनी नगदी पीके घेत आहेत. शेतीकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. त्यात महाराष्ट्राचा विचार करता प्रामुख्या ऊसाचे पीक घेण्यावरच शेतकऱ्यांचा अधिक भर दिसतो. त्याचे कारण वाढती साखर कारखानदारी आणि हमखास किमान चांगला भाव मिळण्याची हमी त्यामुळे शेतकऱ्यांचा ऊस लागवडीकडे अधिक भर दिसतो. ऊस हे प्रामुख्याने उष्ण कटिबंधीय पीक असल्याने भारतात ऊसाचे चांगले उत्पादन

होते. महाराष्ट्राचा विचार करता राज्यात गेल्या वीस वर्षात साखर कारखानदारी वाढल्याने ऊसाचे क्षेत्रही प्रचंड प्रमाणात वाढले आहे.

शेतकऱ्यांनाही नगदी पीक म्हणून ऊस लागवडीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. या ऊस उत्पादनाच्या क्षेत्रावर साखर कारखानदारी अलवंबून आहे. म्हणूनच आज शेती क्षेत्राबरोबरच अर्थव्यवस्थेतही ऊस या पीकाला अन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ऊस उत्पादन करताना जमीनीचा विचार करता प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे शेतकऱ्यांचा नगदी पीकामुळेच अधिक ओढ असल्याने दिसून येते. यात ऊस हे पीक आज महाराष्ट्रात प्रमुख पीक म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी लागवड करताना पूर्वी शेतकऱ्यांना पारंपारिक पद्धतीच माहित होत्या आज मात्र परिस्थिती पूर्ण बदललेली आहे. पारंपारिक पद्धती बरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाशी जोड या शेतीला आज मिळाली आहे.

ऊस शेती ही पाण्याचा जिथ खात्रीचा पुरवठा होऊ शकते. अशा ठिकाणी एकवटलेली आसते. बारमाही वाहत्या नदीचे क्षेत्र, मोठ्या सिंचन प्रकल्पाचे लाभक्षेत्र, वर्षभर पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरी अशा क्षेत्रात प्रामुख्याने ऊस शेती केली जाते. मात्र बदल्या काळात निसर्गाचे चक्रही आवश्यक पाणी उपलब्ध असेल असे नाही. त्यामुळे आजच्या परिस्थितीत पाण्याच्या बाबतीत बिकट होत चाललेली आहे. एकंदरित पाहिले तर महाराष्ट्रात असेल व मराठवाड्यात आणि नांदेड जिल्ह्यात असेल ऊस उत्पाद शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

महाराष्ट्र व नांदेड जिल्ह्यातील मागील काळात पाहिले तर ऊसाचे क्षेत्र जास्त प्रमाणात होते त्याचे कारण मागील काळात दोन वर्षी पूर्वी पाऊस पडण्याचे प्रमाण जास्त होते आजची परिस्थिती पाहिले तर ऊस क्षेत्राचे प्रमाण हे घटक चाललेले आहेत. त्याचे कारण पाऊस पडण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास हा विषय संशोधन करण्यासाठी निवडलेला आहे.

**संशोधनाचे महत्त्व (Significance of the Research) :**

आज जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या माध्यमाने देशात विकासाच्या प्रक्रियेस वेग धरत आहे. त्या नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा आढावा घेण्यात येतो. कृषी

क्षेत्रात शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करण्यात येते. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा विकास दर कोसळतो.

आजच्या बदल्या परिस्थितीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती काय आहे याची चिकित्सा करण्यात येते. शासनाच्या पातळीवर ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या परिस्थितीत सुधारणा झाली आहे का? ते देशाच्या शेतकऱ्यांच्या बाबतीत किती हितकारक आहे हे आपणास कळते. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासन व साखर कारखान्यानी कोण-कोणत्या भूमिका घेतल्या यांचा अभ्यास करण्यात येतो.

**संशोधनाची व्याप्ती Scope of the Research:**

नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास करताना या संशोधन अभ्यासाची व्याप्ती प्रादेशिकतेच्या दृष्टीने फक्त नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषनात्मक मर्यादित अभ्यास आहे. नांदेड जिल्ह्यातील ऊस क्षेत्राचे प्रमाण आजच्या परिस्थितीत घटत चालेले आहे. अभ्यास क्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषणात्मक संदर्भात प्रस्तुत अभ्यास करणार आहे. नांदेड जिल्ह्यातील पर्जन्यमान, जलसिंचन ऊसाची पिक पद्धती व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा एक विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा या विषयाचा मुख्य हेतू असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या शोधणे व काही निष्कर्ष काढून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यावर उपाय योजना सुचविणे या विषयाचा अभ्यास करणे हे महत्त्वाचे उद्दिष्टे आहे.

**संशोधनाच्या मर्यादा (Limitation of the Research) :**

१. या संशोधन अभ्यासाची मर्यादा फक्त नांदेड जिल्ह्यापूर्ती आहे.

२. या संशोधनाची प्राथमिक स्त्रोताची माहिती ही प्रश्नावलीद्वारे गोळा केली जाईल.

३. या संशोधनात फक्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा अभ्यास करण्यात येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Research) :**

अभ्यास क्षेत्रातील या ऊस उत्पादनाची व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची नेमकी स्थिती काय आहे. अभ्यास क्षेत्रात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी आहेत. कारण त्यांना ऊस उत्पादन करीत असताना येणाऱ्या अडचणी आणि ऊस लागवडीपासून ते ऊस साखर

कारखानाच्या पोहचण्या पर्यंत करावी लागणारी कसरत याचा आढावा घेण्याच्या दृष्टीने ऊस उत्पादनाची स्थिती व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एक विश्लेषनात्मक अभ्यास करणे.

१. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्याचा अभ्यास करणे.
२. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी साखर कारखान्यांनी केलेल्या विविध भूमिकेचा अभ्यास करणे.
३. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अपेक्षा जाणून घेणे.
४. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्येवर उपाय योजना सुचविणे.

**संशोधनाची गृहितके (Hypothesis of the Research):**

१. नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे भूधारण क्षेत्र व त्यांच्या समस्या यात काही संबंध नाही.
२. शासनाचे धोरण नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यावर परिणामकारक नाही.

**संशोधन पद्धती (Research Methodology) :**

संशोधन पद्धती ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन ही पद्धती मानवाच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत संशोधन पद्धती महत्त्वाची मानली जाते.

उदा. कलाशास्त्र, विज्ञानशास्त्र, वाणिज्यशास्त्र संशोधनामध्ये वेगवेगळया पद्धतीने संशोधन केले जाते. संशोधनामध्ये सत्यमाहितीचे संकलन केले जाते. यावरून हे स्पष्ट होते की, सामाजिक संशोधन वैज्ञानिक नियमानुसार असा मानवी क्रीयाकडे संकेत करते की ज्याद्वारे सामाजिक जीवनाच्या संबंधतात आपल्या ज्ञानाची वृद्धी घेणे शक्य होते. तसेच अनेक घटना आणि त्यांच्या कारणाच्या संबंधात आणनारा वैज्ञानिक बोध होतो. तसेच अनेक घटना आणि त्याच्या कारणामध्ये संबंधाच्या संदर्भात आपणास महत्त्व आहे.

**तथ्य संकलन (Data Collection) :**

कोणत्याही संशोधनात एकदा अध्ययन विषय निश्चित झाला की, त्या विषया संबंधी तथ्य गोळा करणे अतिशय गरजेचे असते. त्यासाठी संशोधकाने अध्ययन सुरू करण्यापूर्वी तथ्य

संकलन व साधनांची व तंत्राची माहिती करून घेतली तसेच संशोधनातील फरक उपयोगात आणण्याच्या पद्धती त्याचे प्रकार इत्यादी बाबत संशोधकाने जाणीव करून घेतली.

**प्राथमिक तथ्य (Primary Data) :**

संशोधकाने प्रथम प्रयत्नातून किंवा अध्ययनातून प्राप्त केलेल्या प्राथमिक तथ्य असे म्हणतात. त्यासाठी ज्या पद्धतीचा अवलंब केला जातो. त्या पद्धतीला तथ्य संकलनाची प्राथमिक स्त्रोत म्हणतात. या मध्ये प्रामुख्याने प्रश्नावलीच्या द्वारे.

प्रस्तुत विषयाच्या संशोधकाने संशोधनासाठी प्राथमिक पद्धती व स्त्रोत यांचा अवलंब करून मुलाखत, प्रश्नावली, यांच्या साहाय्याने माहिती जमा करून संशोधकाने कार्य पूर्ण करणार या करिता संशोधकाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक प्रश्नावली तयार करून घेणार आहे. या प्रश्नावलीमधील माहितीच्या आधारे ऊस उत्पादक शेतकऱ्याकडून जाणून घेणार या माहितीच्या आधारे संशोधनाचे कार्यपूर्ण केले जाणार आहे.

१. प्रश्नावली व सर्वेक्षण

**दुय्यम तथ्य (Secondary Data) :**

प्रकाशित आणि अप्रकाशित अशा सर्व लेखी सामुग्रीचा दुय्यम पद्धती किंवा स्त्रोतामध्ये समावेश होतो. संशोधकाला आपल्या विषयाशी संबंधित असणारी महत्त्वपूर्ण माहिती, आकडेवारी इत्यादी बाबी या माध्यमाद्वारे प्राप्त होतात दुय्यम स्त्रोतातून मिळणारी माहिती अध्ययन विषयाच्या बाबतीत प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची असते.

संशोधनकर्त्याने प्राथमिक पद्धती सोबतच तथ्य संकलनासाठी दुय्यम पद्धतीचा देखील वापर करून प्रस्तुत संशोधनात केला यामध्ये सार्वजनिक लेख्यातील स्त्रोत असे अभिलेख प्रकाशित आकडे, वृत्तपत्रामधील प्रकाशित कात्रणे, मासिके, अनियतकालिके, विविध खात्याचे व समित्याचे अहवाल विविध संदर्भ ग्रंथ इत्यादी.

१. पुस्तके

२. मासिके

३. वेबसाईट

४. प्रकाशित अहवाल

५. बातमीपत्र

६. संशोधन पेपर

७. जि. प. मधील सांख्यिकी कार्यालयातील अहवाल

**नमुना पद्धती (Sampling Method) :**

प्राथमिक माहितीचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली पद्धतीचा वापर करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील एकूण सोळा तालुक्याचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनासाठी जिल्ह्यातील एकूण सोळा तालुक्यातून ज्या तालुक्यात ऊसाचे क्षेत्र जास्त आहे. अशा आठ तालुक्यांची निवड करण्यात येईल त्या प्रत्येक तालुक्यातून एकूण ५० ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून (अल्पभूधारक ३०, मध्यम भूधारक १५ आणि मोठे भूधारक ५) प्रश्नावलीचा वापर करून माहिती गोळा करण्यात येईल. नमुना निवड ही दैवप्रणाली व सोयीस्कर पद्धतीने केली जाईल. याचा समावेश आहे.

**सांख्यिकी तंत्रे आणि साधने (Statistical tools & Techniques):**

तथ्य गोळा करण्यात आल्यानंतर त्याचे सारणीकरण किंवा विश्लेषण करण्यात येईल व सांख्यिकी तंत्रे व साधने त्याच बरोबर सरासरीमध्ये, मध्यांक आणि बहुलक सहसंबंध इत्यादी सांख्यिकी तंत्र आणि साधने यांचा वापर करण्यात येईल.

**प्रकरण योजना (Chapter Plan) :**

**प्रकरण पहिले - प्रस्तावना**

या प्रकरणात प्रथमता संशोधन विषयाशी संबंधित व सविस्तर प्रस्तावना आणि संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा त्यानंतर संशोधनाचे उद्दिष्टे व संशोधनाचे गृहिते आणि संशोधन पद्धतीचा इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण दुसरे - पूर्व साहित्याचे पूर्नरावलोकन**

या प्रकरणात शेतकऱ्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमि व आढावा घेण्यात येईल. भारतातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या स्थितीचा आढावा घेण्यात येईल.

**प्रकरण तिसरे - नांदेड जिल्ह्यातील दृष्टिक्षेप**

या प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील ऐतिहासिक पाश्वूभूमी, प्राकृतिक रचना व इवामान, पिक परिस्थितीचा आढावा आणि दळणवळण व वाहतूक जिल्ह्यातील नदीप्रणाली व सिंचन व्यवस्थेचा शोध इत्यादी बाबीचा या प्रकरणात अभ्यास करण्यात येईल.

**प्रकरण चौथे - ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या**

या प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका निहाय ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा अभ्यास करण्यात येईल व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कोणकोणत्या अडचणी आहेत याचा अभ्यास करण्यात येईल.

**प्रकरण पाचवे - तथ्याचे विश्लेषण व अर्थबोधन**

या प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्याकडून प्रश्नावली गोळा करण्यात येईल प्रश्नावलीच्या अनुषंगाने त्यांचे सारणी व स्तंभ या स्वरूपात तथ्याचे विश्लेषण करण्यात येईल.

**प्रकरण सहावे - निष्कर्ष व सूचना**

या प्रकरणात संशोधनाविषयी पारदर्शकता ठरविणे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या परिस्थिती विषयी समस्या व उपाययोजना करण्यात येतील.

**संदर्भ सूची (Referecne):**


१. लातूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक व साखर उद्योग एक भौगोलिक विश्लेषण मार्गदर्शक प्रा. डॉ. सुरेश फुले.

२. लातूर जिल्ह्यातील गुळ उत्पादन विपनणाचे आर्थिक अभ्यास संशोधक चिंते गोविंद व्यंकटराव

३. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीचा एक अभ्यास संशोधक चिंतले नागनाथ लक्ष्मण मार्गदर्शक डॉ. बी. व्ही. डाकोरे.

४. कुरूक्षेत्र ग्रामीण विकास को समर्पित मासिक, डिसेंबर २०१५


**संशोधक** **मार्गदर्शक**